Annexure – IX

**UNIVERSITY GRANTS COMMISSION**
**BAHADUR SHAH ZAFAR MARG**
**NEW DELHI – 110 002**

**PROFORMA FOR SUBMISSION OF INFORMATION AT THE TIME OF SENDING THE FINAL REPORT OF THE WORK DONE ON THE PROJECT**

1. NAME AND ADDRESS OF THE PRINCIPAL INVESTIGATOR :-

**Dr. Dinkar Eknath Umbarkar, Asso. Prof.,**
**Dept of Sociology, Sitabai Arts, Commerce & Science College, Akola (MS)**

2. NAME AND ADDRESS OF THE INSTITUTION :- **Sitabai Arts, Commerce & Science College,Civil lines, Akola (MS)**

3. UGC APPROVAL NO. AND DATE :- **file no 23 -1850/14 (WRO) Dated: 15 Feb. 2016**
4. DATE OF IMPLEMENTATION :- **01 Mar. 2016**
5. TENURE OF THE PROJECT :- **Two years ( 01 Mar 2016 to 01 Mar 2018 )**
6. TOTAL GRANT ALLOCATED :- **80,000 /-**
7. TOTAL GRANT RECEIVED :- **60,000/-**
8. FINAL EXPENDITURE :- **89,577 /-**
9. TITLE OF THE PROJECT :- **"Amravati Vibhagatil Khar Jamin Shetratil Shtkaryanchya Samajik va Arthik Samasyanche Vishleshanatmak Adhayan"**
10. OBJECTIVES OF THE PROJECT :-
    १) खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्यांच्या मुळ कारणांचा शोध घेणे.
    २) खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या सामाजिक समस्या जाणूण घेणे.
    ३) खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या आर्थिक, सामाजिक व आरोग्य विषयक दर्जा तपासणे.
    ४) शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासाकरिता विविध शिफारशी सूचविणे.
11. WHETHER OBJECTIVES WERE ACHIEVED ...होय... (GIVE DETAILS)

- खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्यांच्या मुळ कारणांचा शोध या संशोधनामधून घेतला गेला आहे.
- खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या सामाजिक समस्या या संशोधनामधून विस्तारपूर्वक व अभ्यासपूर्ण रितीने जाणून घेतल्या गेलेल्या आहेत.
- खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या आरोग्य विषयक समस्या उदा. किडनीच्या समस्या, कावीळची समस्या व कुपोषणाच्या समस्यांची कारणमिमांसा या संशोधनातून केली गेल्या आहे.
- खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांचा आर्थिक दर्जा, सामाजिक दर्जा व आरोग्यविषयक दर्जा कसा आहे या संदर्भात या संशोधनामधून बोध झालेला आहे.
- या संशोधनामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासाकरिता काही उपयुक्त सुचना व शिफारशी या संशोधनातून सुचविल्या आहेत.

Arts, Commerce & Science College AKOLA

## 12. ACHIEVEMENTS FROM THE PROJECT :-

- शेतकऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक, आरोग्य विषयक व शिक्षण विषयक समस्या वैज्ञानिक दृष्टया समजून घेतल्या गेलेल्या असल्यामुळे त्यावर महत्त्वपूर्ण शिफारशी सुचविता आल्या. त्याचा परिणाम निश्चितच शेतकऱ्याना होवू शकतो.
- शेतकऱ्यांकरिता शासनाद्वारा ज्या योजना राबविल्या जातात त्या योजनांचा अभ्यास करुन त्या मधील त्रुटी दुर करण्याचा प्रयत्न या संशोधना मधून झालेला आहे.
- खार जमिन क्षेत्रातील क्षारयुक्त पाण्याचा आणि आरोग्याचा संबंध असल्याचे दिसून आले. त्यावरही या संशोधनामध्ये प्रकाश टाकण्यात आलेला आहे.
- शेतकऱ्यांमधिल कुपोषण, दारिद्रय, अज्ञान, प्रशिक्षणाचा अभाव व आरोग्य विषयक समस्यांचा सखोल अभ्यास या संशोधनामधुन झालेला असल्यामुळे त्याचाही शेतकऱ्यांना निश्चितच फायदा होईल.

## 13. SUMMARY OF THE FINDINGS ( IN 500 WORDS ) :-

प्रस्तुत संशोधनात अमरावती विभागातील खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्यासाठी अमरावती विभागातील अकोला, अमरावती आणि बुलडाणा या तीन जिल्हयातील २०० शेतकऱ्यांची निवड नमुना म्हणून करण्यात आली. त्यांच्याकडून मुलाखत अनुसूची भरुन घेतल्यानंतर प्राथमिक तथ्यांच्या आधारे जे प्रमुख निष्कर्ष समोर आले ते पुढीलप्रमाणे—

* अध्ययनासाठी निवडलेल्या खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांची शेतजमीन ही खारेपाणी क्षेत्रात आणि बोल्डर झोन क्षेत्रात आहे. त्यामुळे जमीनीची उत्पादकता कमी झाली आहे.

* खार जमिन क्षेत्रातील बहुतांश शेतकरी हे अल्पभूधारक आणि कोरडवाहू शेती करणारे आहे.

* खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनीची उत्पादकता खारवटपणामुळे कमी झाली असून त्यामुळे त्यांचे आर्थिक व सामाजिक जीवन विस्कळीत झाले आहे.

* शेतकऱ्यांच्या शेतमालाचा दर्जा घसरला असून त्यांच्या शेतमालाला योग्य किंमत न मिळाल्याने त्यांच्या उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

* खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांचा शेती करण्याचा मुख्य उद्देश अन्नधान्य मिळविणे हा असून सर्वेक्षित शेतकऱ्यांना मात्र वर्षभर खाण्यासाठी पुरेल इतका अन्नपुरवठा देखील त्यांच्या शेतीतून होत नाही. .

*अध्ययनक्षेत्रातील शेतकऱ्यांना अन्नधानाच्या समस्येसमवेत पिण्याच्या पाण्याची समस्या सुध्दा उद्‌भवते.

* खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांना अनेक सामाजिक समस्यांना सामना करावा लागत असून त्यांचा बराच खर्च हा आरोग्यविषयक अडचणी, कर्जफेड यावर होतो त्यामुळे त्यांचा राहणीमानाचा दर्जा खालावलेला आहे.

Commerce & Scie

* खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांना सामुहीक पाणी पुरवठा किंवा नळ योजनेतून मुक्त करण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्या समस्या वाढत चालल्या आहेत.

* खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांना उत्पन्न प्राप्तीची इतर साधने उपलब्ध नाहीत त्यामुळे त्यांच्या आर्थिक समस्या वाढत आहेत.

* खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांना जमीनीची उत्पादकता वाढविण्यासाठी कोणत्याही त्यांना प्रकारचे प्रशिक्षण मिळत नाही त्यामुळे त्यांना अल्पउत्पादकतेची समस्या उद्भवते.

* अमरावंती विभागातील खार जमीन क्षेत्रातील क्षारयुक्त पाण्यामुळे रोगजंतुचा प्रादुर्भाव होतो.

* अमरावती विभागातील खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या पिण्यायोग्य पाण्याचे नमुने घेतले जात नाहीत त्यामुळे शेतकरी आरोग्यविषयक समस्येच्या गर्तेत अडकल आहे.

*अमरावती विभागातील खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांना पोटदुखी, किडनीस्टोन सारखे आजार झाले आहते यातून त्यांच्या आरोग्यविषयक समस्या गंभीर झाल्या आहेत.

* अमरावती विभागातील खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी रस्ते उपलब्ध नाहीत त्यामुळे मिळेल त्या भावात शेतमाल शेताच्या बांधावर विकावा लागतो.

* खार जमीन क्षेत्रातील शेतकऱ्यांना शेतजमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी सिंचनाच्या सुविधा सुध्दा उपलब्ध नसल्यामुळे शेतीची उत्पादकता कमी झाली आहे.

* खार जमिन क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना यशस्वी झाल्या नाहीत यामुळे सुध्दा शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांमध्ये वाढ झाली आहे.

* अमरावती विभागातील खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांची अल्प उत्पादकता, नापिकी यामुळे शेतकऱ्यांना कर्ज काढावे लागत असून, जुने कर्ज सुध्दा ते फेडू शकत नाहीत यातून त्यांच्यात कर्जबाजारीपणा वाढला आहे.

थोडक्यात, अमरावती विभागातील खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांना अनेक समस्यांना तोड द्यावे लागत असून, लघु शोध प्रकल्पात याबाबत सविस्तर निष्कर्ष आणि शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी उपाय सुचविले आहेत. या उपयांची योग्यरित्या अंमलबजावणी केली गेल्यास शेतकऱ्यांच्या समस्या सोडविता येतील तसेच त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत सुधारणा होवून त्यांना जीवन जगणे सुलभ होईल.

14. CONTRIBUTION TO THE SOCIETY ( GIVE DETAILS ) :-

या संशोधनामुळे खार जमिन क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या समस्या, त्यांचा राहणीमानाचा दर्जा, त्यांचे शिक्षण व प्रशिक्षणाची स्थिती व त्यांची आर्थिक स्थिती या संबंधीचे संखोल व सुक्ष्म ज्ञान या संशोधनामधून सर्वसामान्या प्र्यंत पोहचेल. तसेच विद्यार्थी व संशोधकांना या संशोधनाचा इतर अध्ययनामध्ये संदर्भ म्हणून फायदा होईल.

Commerce & Science College AKOLA

13

शेतकऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक व आरोग्य विषयक समस्या सोडविण्याकरिता शासनाला व स्वंसेवी संस्थांना या अध्ययनाचा निश्चितच उपयोग होईल. तसेच शेतकऱ्या विषयी धोरणे आखतांना या संशोधनाचा आधार शासनास घेता येईल.

15. WHETHER ANY PH.D. ENROLLED/PRODUCED OUT OF THE PROJECT ......NIL ....

16. NO. OF PUBLICATIONS OUT OF THE PROJECT ( PLEASE ATTACH RE-PRINTS) ......NIL....

20

| ( PRINCIPAL INVESTIGATOR ) | (REGISTRAR/PRINCIPAL) | (CO-INVESTIGATOR) |
| --- | --- | --- |
| | | ----NIL---- |
| Dr. D. E. Umbarkar | Principal<br>Sitabai Arts, Commerce & Science College,<br>AKOLA | |
| Dr. Dinkar Umbarkar<br>Head, Asso. Prof. & Ph.D. Supervisor<br>Dept. of Sociology<br>Sitabai Arts College, AKOLA | Sitabai Arts, Commerce & Science College, AKOLA | |